# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे/अतितात्काळ कालमर्यादा/ईमेलद्वारे**

क्रमांक :प्रनिप्रा/प्र.क्र. २०/प्रवेश-२०२२/प्र.शु./प्रवेश-मान्यता/१०७ दिनांक : 30 JAN 2023

## परिपत्रक

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व व्यावसायिक पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रमांची महाविद्यालये.
महाराष्ट्र राज्य.

विषय: **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क अदा करण्याबाबत.**

संदर्भ: **१) मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(क) मधील निर्णय.**
**२) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतुदी.**
**३) प्रवेश नियामक प्राधिकरणाचे समक्रमांकाचे दि.२१/१२/२०२२ रोजीचे परिपत्रक.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ कलम १६ (३) मधील तरतूदीन्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधीनल प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक ४(क) अन्वये प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चित करण्यात आलेले आहे (सुलभ संदर्भाकरिता प्रत संलग्न),

त्यानुसार या http://www.maha-ara.org/ara/approval_२२/ लिंकद्वारे विहित केलेले "प्रक्रिया शुल्क" राज्यातील सर्व संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी **पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन पध्दतीने निश्चितपणे** सादर करावे.

**(महेन्द्र ब. वारभुवन,** भा.प्र.से.)
**सचिव**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**आयुक्त व सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.**

सोबत - वरीलप्रमाणे

[कृ.मा.प.]

D:\Jayant\Schedule_Verification2022.docx

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित, -

१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.

४) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई

५) संचालक, कृषी शिक्षण संचालनालय, पुणे.

६) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत माहितीकरीता अग्रेषित,

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) मा. प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत, -

१) सर्व संबंधीत परिक्षा समन्यमक / सहाय्यक परिक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

२) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक.

३) मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.

४) निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ रोजी दुपारी ०३:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ६८व्या बैठकीचे इतिवृत्त.-

विषय क्रमांक ४: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६(३) मधील तरतूदीन्वये प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क वेळोवेळी निश्चित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ते २०२०-२१ पर्यंत "प्रक्रिया शुल्क" निश्चितीच्या सुत्रामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नव्हता, तथापि शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये सदरील सुत्रामध्ये बदल करुन मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. ६(अ) मधील निर्णयानुसार खालील प्रमाणे "प्रक्रिया शुल्क" आकारणी करण्यात आलेले आहे,-

अ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कोटयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. १००/- परंतू रु. २०,०००/- पेक्षा कमी नसावे.

ब) अनिवासी भारतीय कोटा (NRI) विद्यार्थी प्रवेशाकरिता प्रति विद्यार्थी रु. ३०००/-

क) व्यवस्थापन कोटा (Management Quota) / संस्थास्तरीय कोटयातील (Institutional Quota) विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. २०००/-

सद्यस्थितीमध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण होत असल्यामुळे प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क लवकरात लवकर निश्चित करणे क्रमप्राप्त ठरते.

या अनुषंगाने मागील शैक्षणिक वर्षामध्ये प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्र. ६(अ) मधील निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या सुत्राप्रमाणे त्याच धर्तीवर शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांकडून वसूल करण्यात येणाऱ्या प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चितीबाबत खालील सुत्राप्रमाणे निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे,-

| CAP Quota (Total Seats) | Over and above actual admissions of TFWS / EWS / PMSSS / J&K, etc. | Total (1+2) | Rs. 100 x No. of admissions shown in column No. (3), but not less than Rs. 20,000/- | No. Institutional / Management Quota (Total Seats) x Rs. 2000/- | No. of Actual NRI admissions x Rs. 3000/- | Total Processing Fees (Column No. 4+5+6=7) |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| | | | | | | |

वरील सुत्रानुसार प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उचित कार्यवाही त्वरीत करावी.

******